माहे नोव्हेंबर-२०१६ ते जानेवारी-२०१७ मध्ये होणाऱ्या नगर परिषद/नगर पंचायतींच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकीकरिता विधानसभेची मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी मतदारांची नोंद वेळीच ERMS मध्ये घेण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. १७/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ जून, २०१६.

संदर्भ:- १. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांचे क्रमांक- ईएलआर-१००४/प्र.क्र.५६५/०४/३३,दिनांक ८ डिसेंबर, २००४ चे पत्र
२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/२०१५/प्र.क्र.३/ प्रकल्प कक्ष, दिनांक १७ एप्रिल, २०१५.

## आ दे श

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करणे व निवडणुकांचे अधिक्षण, संचलन व नियंत्रणाची संपूर्ण जबाबदारी, लोकसभा व विधानसभेकरिता "भारत निवडणूक आयोग" व राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता "राज्य निवडणूक आयोग" यांची आहे.

२. आणि ज्याअर्थी, "भारत निवडणूक आयोग" दरवर्षी विहित केलेल्या अर्हता दिनांकास (१ जानेवारी) खाली नमूद केलेले मुख्य टप्पे वापरून विधानसभा मतदार यादी तयार करते व त्यामध्ये निरंतर मतदार नोंदणी प्रक्रियेअंतर्गत सुधारणा करते:-

(i) मतदार नोंदणी अधिकारी यांनी नमुना ६, ७ व ८ इत्यादीमध्ये अर्ज स्विकारणे व जास्तीत-जास्त ३ दिवसांत त्या अर्जाची ERMS मध्ये नोंद करणे, व

(ii) मतदार नोंदणी अधिकारी यांनी या अर्जावर विहित कालावधीत व विहित कार्यपध्दतीनुसार निर्णय घेणे व त्यानुसार ERMS मध्ये स्वीकृत किंवा अस्वीकृत याबाबतची नोंद घेऊन मुख्य निवडणूक अधिकारी स्तरावर मतदार यादीचा डेटाबेस अद्ययावत करणे.

३. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनिमय, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) च्या कलम ११ मधील तरतुदीनुसार नगर परिषद/नगर पंचायत निवडणुकांकरिता

"राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी नगर परिषद/नगर पंचायतींच्या संबंधित प्रभागांमध्ये विभागून वापरण्यात येते. "

४. आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी वापरावयाच्या मतदार यादीबाबत राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/४/२०१५ च्या आदेशान्वये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

५. आणि ज्याअर्थी, नोव्हेंबर-२०१६ ते जानेवारी-२०१७ मध्ये होणाऱ्या नगर परिषद/नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १० सप्टेंबर, २०१६ हा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक अधिसूचित केला असून, त्यानुसार महाराष्ट्र विधानसभेची दिनांक १ जानेवारी, २०१६ या अर्हता दिनांकावर प्रसिध्द केलेली मतदार यादी तसेच त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकापर्यंत प्रसिध्द झालेल्या मतदार यादीच्या पुरवण्या आणि निरंतर प्रक्रियेमध्ये अंतिम झालेल्या मतदारांची नावे विचारात घेण्यात येतील.

६. आणि ज्याअर्थी, अशा स्पष्ट सूचना असूनही राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीबद्दल स्थानिक पातळीवर अजूनही खालीलप्रमाणे संभ्रम आहे :-

(i) प्राप्त झालेल्या अर्जांवर विशिष्ट दिनांकापर्यंत निर्णय होऊन तयार झालेली मतदार यादी, किंवा

(ii) विशिष्ट दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व अर्जांवर निर्णय घेऊन तयार झालेली मतदार यादी.

७. त्याअर्थी, वरील संभ्रम दूर करण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १० अ (४) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी बिनचूक, त्रुटीविरहित तयार करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(i) राज्य निवडणूक आयोग यांनी अधिसूचित केलेल्या दिनांकास (१०/९/२०१६) अस्तित्वात असलेली व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली विधानसभेची मतदार यादी (ERMS मध्ये असलेल्या अद्ययावत डेटाबेसच्या स्वरुपात) संबंधित नगर परिषद/नगर पंचायतींच्या

निवडणुकांसाठी वापरली जाईल. (त्यानुसार विशिष्ट दिनांकापर्यंत निर्णय झालेले सर्व अर्ज विचारात घेण्यात येतील.)

(ii) भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे नागरिकांनी मतदार नोंदणी / मतदार यादी दुरुस्तीकरिता (नमुना ६, ७ व ८ इत्यादीमध्ये) अर्ज दिल्यानंतर संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्या अर्जाची नोंद जास्तीत जास्त ३ दिवसात ERMS मध्ये करावी.

(iii) मतदार नोंदणी अधिकारी यांनी या अर्जावर विहित कालावधीत व विहित कार्यपध्दतीनुसार निर्णय घेणे आवश्यक असून, त्यानुसार ERMS मध्ये स्वीकृत किंवा अस्वीकृत याबाबतची नोंद घेऊन मुख्य निवडणूक अधिकारी स्तरावर मतदार यादीचा डेटाबेस अद्ययावत करावा.

(iv) राज्य निवडणूक आयोग आगामी नगर परिषद/नगरपंचायत निवडणुकांकरिता जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून मतदार यादी न घेता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकापर्यंत (दिनांक १०/९/२०१६ पर्यंत) ERMS मध्ये अद्ययावत झालेली मुख्य निवडणूक अधिकारी स्तरावरील मतदार यादी वापरणार आहे.

(v) ह्याकरिता जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कामाचा नियमितपणे आढावा घ्यावा.

(vi) मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांवर विहित कालावधीत व विहित कार्यपध्दतीनुसार निर्णय न झाल्यास आणि त्यामुळे मुख्य निवडणूक अधिकारी स्तरावरील दिनांक १०/९/२०१६ या दिनांकापर्यंतची मतदार यादी अद्ययावत होऊ शकली नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची राहील.

(vii) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडून ERMS मध्ये सर्व पात्र मतदारांची नोंद पूर्ण केल्याबाबत प्रमाणपत्र घ्यावे व त्या प्रमाणपत्राच्या आधारे सोबत जोडलेल्या नमुन्यात राज्य निवडणूक आयोगास प्रमाणपत्र

पाठवावे. सदर प्रमाणपत्र अधिसूचित दिनांकापासून ३ दिवसांत म्हणजेच १४/९/२०१६ पर्यंत राज्य निवडणूक आयोगास प्राप्त होईल याची खबरदारी घ्यावी.

(viii) कामामध्ये कुचराई व दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

(ix) वरील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करताना जर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती किंवा तांत्रिक अडचण उद्भवली तर त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे योग्य ते निर्देश प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची राहील.

८. हे आदेश मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( जे. पी. गुप्ता )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
१. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
५. निवड नस्ती.

जिल्हयाचे नाव:-....................

( राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. १७/का.६,

दि. २३/०६/२०१६ अन्वये विहित केलेले प्रमाणपत्र )

**प्रमाणपत्र सादर करण्याची तारीख:- १४/९/२०१६**

## प्रमाणपत्र

## (जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सादर करावयाचे)

प्रमाणित करण्यात येते की,

१. -----------, -----------, -------, या नगर परिषद/नगर पंचायतींच्या सार्वत्रिक /पोट निवडणुकीकरिता राज्य निवडणूक आयोगाने दि.१०/९/२०१६ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्राहय धरण्यात येईल असे अधिसूचित केलेले आहे.

२. या निवडणुकीकरिता -------, ---------, ------, या विधानसभा मतदारसंघाची उपरोक्त दिनांकास अस्तित्वात असलेली अद्ययावत मतदार यादी वापरण्यात येणार आहे.

३. सदर विधानसभा मतदारसंघात उक्त अधिसूचित केलेल्या दिनांकापर्यंत नियमानुसार पात्र झालेल्या नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रातील सर्व मतदारांची नोंद ERMS मध्ये अधिसूचित केलेल्या दिनांकापर्यन्त अद्ययावत करण्यात आलेली आहे.

सही

दिनांक :- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी.............

(नाव नमूद करावे)

(टीप :- सर्व मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून वरील आशयाचे प्रमाणपत्र घेऊन, त्या आधारावर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी वरील प्रमाणपत्र सादर करावे.)

प्रत:-

मुख्याधिकारी, संबंधित नगर परिषद/ नगर पंचायत

माहे नोव्हेंबर,२०१६ ते जानेवारी,२०१७ मध्ये होणा-या नगर परिषदा / नगर पंचायतींच्या सार्वत्रिक व रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा दिनांक अधिसूचित करणेबाब....

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २३/०६/२०१६.

## आदेश

क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१७/का-०६, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन दिनांक १० सप्टेंबर, २०१६ रोजी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या, या अधिनियमांतर्गत असलेल्या नगरपरिषदा / नगर पंचायतींच्या माहे **नोव्हेंबर-२०१६ ते जानेवारी-२०१७** मध्ये होणा-या सार्वत्रिक / पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध.मा.कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.